दुधावरची साय

ले. दिवाकर कारखानिस

माझा जन्म झाला तेव्हा मी रहात होते गिरगावांत ऑपेराहाऊसला. माझं सारं लहानपण गेलं गोरेगांवकरांच्या चाळीत. बारा बिऱ्हाडे खाली आणि बारा वर. चाळीच्या मधुन वर जाण्याचा जिना. जिन्याखालच्या छोटया खोलीत रहायचा पांडुरंग. तो आणि त्याची बायको रखमा हातगाडीवर भाज्या फळे विकायची. ऑपेरा हाऊसपासून ते थेट मॅजेस्टिक सिनेमापर्यंत पाडुरंगची गाडी फिरायची त्या काळांत ! मॅजेस्टिक सिनेमाच्या समोर विरकरांची खाणावळ जिथं संध्याकाळी खूप गर्दी असायची. ऑपेराहाऊस पासून ते थेट ठाकूरद्वारनाक्यापर्यंत रस्ता अगदी माणसांनी फुल्ल भरलेला असायचा. आमच्या चाळीतल्या आज्या हातांत कापसाच्या लडया आणि फुलपात्र घेऊन गोऱ्यारामाच्या मंदिरांत पाती-फुलपाती पळायला हमखास जाताना दिसायच्या. रॉक्सी सिनेमाच्या गल्लीत डॉ. केंकऱ्याचे हॉस्पिटल होतं..लहानसच. आमच्या भागांतील मराठी कुटुंबाचं ते मोठंच आशास्थान होतं. त्या भागांतील असंख्य मुलामुलींचे जन्म त्या हॉस्पिटलांत झाले होते.

ऑपेराहाऊसपरून अनेक ठिकाणी बसने जाता येत असे. चालत जायचे म्हटले तरी चर्नीरोडस्टेशन जवळच होते. मी जेव्हा जयहिंद कॉलेजला जायचे ठरविलं तेव्हा बाबा जरा नाराज झाले. त्यांना मी झेवियर्स अथवा विल्सन कॉलेजला ॲडमिशन घ्यावी असं वाटत होतं. पण माझ्या बऱ्याच मैत्रिणी जयहिंदला गेल्या होत्या. मी अकौंटीग घेऊन पुढे सी.ए. करायचं ठरविलं होत. सी.ए. ची आर्टिकल्स भरीत असताना मला राहूल देसाईंच प्रपोजल आलं. राहूल आय.आय.टीचा इंजिनियर होता आणि शिवाय तो काही काम्पुटरचे कोर्सेसपण करत होता.

पहिल्या भेटीतच मला तो आवडला. खेळकर पण उमदा ,स्वाभिमानी तितकाच जिद्दीचा आणि आपल्या भविष्यावर अचल विश्वास ठेवणारा होता. धरसोडी वृत्ती अजीबात नव्हती. लग्नाआधी आम्ही एकदोनदाच भेटलो असूं. त्याने ठाण्याला फ्लॅट घेऊन ठेवला होता. लग्नानंतर आम्ही ठाण्याला रहायला आलो तेव्हा राहूलने मला सांगितलं की मी लग्न झालं असल तरी अर्धवट शिक्षण सोडायच नाही आणि राहिलेली आर्टिकलशीपची दोन वर्षे पुरी करायची आणि तो पर्यंत कुटुंबात नवीन मेंबर नाही.

एक दिवशी अचानक मला माझ्या भावाचा, अविनाशचा फोन आला.

" हॅलो अंजली, मी भाऊ बोलतोय गिरगांवहून..बाबांना हार्टअटॅक आलाय. आम्ही त्यांना ॲम्बुलन्सने बॉम्बे हॉस्पिटलला नेतोय. तू ताबडतोब तिकडे ये."

मला दरदरून घाम फुटला. मी सोफ्यावर मरगळून बसले. राहूल कॉम्पुटरवर काम करत होता. फोन आल्याबरोबर त्याचं इंटरनेट बंद झाले. वळून त्यानं माझ्याकडे पाहिलं.
" कां ग अंजू काय झालं ? कुणाचा फोन होता ? "
" भाऊचा फोन होता. बाबांना हार्ट ॲटॅक आलाय. त्यांना बाम्बे हॉस्पिटल मध्ये नेलंय.." घाईघाईने मी बोलले.

राहूल ताडकन उठला. आम्ही भराभर कपडे केले आणि टॅक्सीकरून बॉम्बेहॉस्पिटलला आलो. बाबांना I.C.U. मध्ये ठेवलं होतं. त्यांचा Electro Cardiogram काढला होता.त्यांत बाबांच्या चार आर्टरीज ब्लॉक झाल्याचे दिसून आलं होतं आणि ताबडतोब By-Pass करणे आवश्यक होतं. ऑपरेशनचा खर्च दोन लाखांचेवर होता.

अविनाश काळजीत होता.एवढया पैशाची कशी सोय करायची याची विवंचना त्याला भेडसावीत होती. राहूलच्या लक्षांत त्याची मनःस्थिती आली. तो जवळ येऊन म्हणाला,

" अवि , येवढा कसला विचार करतोस ? अरे आपण सर्व एकाच कुटुंबाचे घटक आहोत. पैशाचा मुळीसुध्दां विचार करू नकोस. मी सर्व व्यवस्था करतो. तू निश्चिंतपणे डॉ.सुखटणकरांना बाबांच्या ऑपरेशनचे सांग."

बाबांची By Pass Surgeoryची व्यवस्थित पार पडली. आईच्या डोळयांतील पाणी खळले नव्हतं. तीन दिवस ती एकटी बाबांच्या जवळ अहोरात्र बसून होती. चौथ्या दिवशी बाबांना खालच्या वॉर्डमध्ये हालवले. दोन दिवस बरे गेले.तिसऱ्या दिवशी अचानक बाबांना उलटी झाली आणि त्यांचा श्वास कोंडू लागला. डॉ. सुखटणकर नशिबाने ड्युटीवर होते. ते ताबडतोब आले. बाबांना परत ICU मध्ये नेले.भराभर उपाय सुरू झाले. आम्ही सर्वजण ICU च्या बाहेर बाकावर बसून होतो. दुपारी तीन वाजता डॉ. सुखटणकर बाहेर आले. त्यांचा चेहरा गंभीर होता. आमच्या काळजांत धस्स झालं.

डॉक्टरांनी भाऊला खूण केली आणि बाजूला बोलावलं.
" मि. कामत , I am very sorry . Your father passed away few minutes ago."
" डॉक्टर कसं हो असं झालं ? '
" आम्ही करायचे ते सर्व प्रयत्न केले.काही उपाय चालला नाही. मृत्यू डॉक्टरांच्या हातांत नसतो. That's destiny."
" पटतं मला तुमचं म्हणणं डॉक्टर ". अविनाश गंभीरपणे म्हणाला.
"Thank you Mr. Kamat for understanding !"

आमच्या आईचं विश्व कोसळून पडलं.ती बिचारी एकटी झाली.. अगदी एकटी !

असेच मरगळलेले दिवस चालले होते. मधून मधून मी आईला भेटून येत होते.आणि एक दिवशी संध्याकाळी राहूल नाचत आला.दार उघडून घरांत शिरला आणि त्यानं मला दोन्ही हातांनी उंच उचललं. मी घाबरीघुबरी झाले. गिरक्या घालत राहूल म्हणाला,

" अंजू.. बघ मी सिलेक्ट झालो. आमची कंपनी मला अमेरिकेला पाठवतेय प्रॉजेक्टवर !"
" अरे वा..Congratulations. Hearty congratulations, Rahul."
" Thanks ! अंजू ..फार फार माझी इच्छा होती अमेरिकेला जायची. नवीन काही खुप शिकायचंय मला !"
" हो माझ्या राजा..तुझं स्वप्न पुरं होतंय. खूप खूप आनंद झालाय मला.पहिला आईला फोन करते.."
" कर ..जरूर कर आईना फोन. त्यांना खूप आनंद होईल."

मी आईशी बोलले. आईला मनापासून खरा आनंद झाला. तिनं लगोलग देवापुढे साखर ठेवली.

माझं आर्टिकल्सचं शेवटचं वर्ष होतं.म्हणून आम्ही ठरवलं की राहूलन एकटयानच प्रथम

अमेरिकेला जायचं आणि वर्षभरानं मागाहून मी जायचं.पुढचे दोन आठवडे, राहूलची पासपोर्ट पासून कपडया पर्यंत सगळी तयारी करण्यांत गेले. त्याच्या कंपनीने त्याला तीन वर्षासाठी H-1 व्हिसा दिला होता. त्याच्या जाण्याच्या तयारीस मदत करण्यासाठी आई गिरगांववरून ठाण्याला आली. आमच्या मित्रमंडळीनी त्याला छान "Send off"पार्टया दिल्या..धमाल आली.

आणि एक दिवस राहूल एअर इंडियाच्या विमानाने न्यूयॉर्कला रवाना झाला.

दिवस कसे भराभर जात होते. मी माझ्या अभ्यासांत गुंग होते. आर्टिकलशिप संपली आणि मला C.A. ची पदवी मिळाली. माझ्या आनंदात भाग घ्यायला राहूल जवळ नव्हता. पण दर शनिवारी त्याचा फोन यायचा. तो पण आता न्यूजर्सीमध्ये सेटल होत होता. आणखीन दोन मित्रांसोबत भागीत त्यानं एडिसन मध्ये एक अपार्टमेंट घेतलं. भाडं जास्त होतं. पण तिघे मिळून एकत्र रहात असल्यामुळे खर्चपण कमी येत होता.

वर्ष संपल आणि राहूलने मला अमेरिकेला बोलावलं. मी जाण्यापूर्वी त्याने तिथेच आजूबाजूला एक बेडरूमचे अपार्टमेंट भाडयाने घेऊन ठेवलं होतं. थोडेफार जुजबी पण आवश्यक फर्निचर घेतलं होतं. बायकांना खरेदीची हौस असते हे लक्षांत ठेऊन त्याने भांडीकुंडी आणि स्वैपाकघरांतील गोष्टी माझ्यासाठी ठेवल्या होत्या.

पहिले काही महिने नव्या नवलाईचे होते. न्यूजर्सीमध्यें शॉपिंग करताना खूप मजा वाटायची. आमच्या पासून जवळच बरीच इंडियन ग्रोसरीची आणि मिठाइची दुकाने होती.... पुण्याच्या चितळे बंधू सारखी ! राहूल मला सर्व समजावून सांगत असे. शनिवार रविवारी तो मला न्यूयॉर्कला घेऊन जाई. त्याचं ऑफिस मॅनहॅटनला पार्क ॲव्हेन्यूवर होतं. पहिल्या तीन चार महिन्यांतच आम्ही जवळ जवळ सर्व मॅनहॅटन पिंजून काढलं. पायी चालून सर्व ठिकाणं पहाण्यासारखी मजा साईटसीईंग बसमध्ये येत नाही.खूप गंमत यायची.

राहुलच्या व्हिसामध्ये मला काम करण्याची परवानगी नव्हती. घरी बसून मला कंटाळा येऊ लागला.म्हणून मी एक काम्पुटर क्लासमध्ये जाऊ लागले. अर्थात राहूलला माझा बेत एकदम पसंत पडला.आमच्या लग्नाला चार वर्षे होऊन गेली होती आणि अद्याप आम्ही दोघेच होतो. राहूलच्या म्हणण्याप्रमाणे त्याची इथली कंपनी त्याला ग्रिनकार्डसाठी स्पॉन्सर करायला तयार होती आणि ते मिळालं की भारताला परत न जाता येथेच कायमचे राहण्याचा त्याचा विचार होता. मला त्यांत काही गैर वाटले नाही. घरी फक्त आई होती आणि भाऊ M.B.A. करून राहूलच्या सल्ल्याने अमेरिकेत येण्याची खटपट करीत होता.

तीन वर्षे कशी भरकन् निघून गेली. राहूलच्या कंपनीने त्याला ग्रिनकार्डासाठी स्पॉन्सर केले.आता दोन वर्षतरी भारतांत जाण्याचा विचार नव्हता. अविनाशला अशाच एका कॅलिफार्नि याच्या लहान कंपनीने त्यांच्या प्रॉजेक्टवर बोलावलं.आता आईच फक्त गिरगांवात एकटी राहिली. आमच्या लग्नाला सात वर्षे झाली होती.पण घरांत पाळणा काही हालला नव्हता. आई मात्र मधून मधून भुणभुण लावायची ..नातवंड हवं म्हणून !

राहूल त्याच्या कंपनीत आता बॉस झाला होता. त्याच्या क्षेत्रांत तो खूप हुषार होता. आम्ही एडिसन सोडून ब्लकवेल फॉरेस्ट या ठिकाणी चार बेडरूमच नवीन घर घेतलं. आता मात्र आईला गिरगांवात ठेवायची नाही असं आम्ही ठरवलं आणि त्याप्रमाणे प्रथम तिला व्हिजिटर व्हिसावर अमेरिकेला आणली.

राहूलचे आणि माझे आता मुलाबद्दल मोकळेपणान बोलणं होऊ लागलं. माझी तिशी उलटून गेली होती. आईपण आता म्हणुं लागली. "पुरे झालं बाई आता तुमचं संतती नियमन ! आमच्यावेळी असं नव्हतं बाई ! मुलाशिवाय बाईच्या जन्माला काही अर्थ नाही..!"

मुलासाठी आम्ही आता उत्सुक झालो होतो.परंतू ज्याज्या वेळी आम्ही जवळ येत असूं त्या त्या वेळी मी राहूलची निराशा करू लागले. कारण नेमकी त्याचवेळी माझी अर्धशिशी-मायग्रेन -चालू व्हायची. ही सवय नव्हती. अगदी खरी वस्तुस्थिती होती.डॉक्टरांना याबद्दल विचारलं तर त्यांनी मायग्रेनवर ठणका थांबणाऱ्या गोळया दिल्या. त्याचा काही उपयोग होई ना तेव्हा आम्ही स्पेशालिस्टकडे गेलो. त्यांनी बऱ्याच टेस्ट केल्या आणि शेवटी असा निर्णय दिला की मी किडनीच्या रोगाने ग्रस्त असून माझ्या दोन्ही किडन्या निकामी झालेल्या आहेत. (Acute kidney failure)

या बातमीनं आम्हा दोघांना हादरा दिला. आमच्या डॉक्टरने लगेच मला एका हॉस्पिटलच्या किडनी स्पेशॅलिस्टकडे पाठविलं. त्यांनी माझे सगळे रिपोर्टस् पाहून निदान केले की किडनी transplant शिवाय दुसरा उपाय नाही. मध्यंतरीच्या कालांत मी माझा आहार सांभाळावा आणि नचुकता डॉक्टरी तपासणी करीत रहावे.ते पुढे म्हणाले ,

" मिसेस देसाई , तुम्हाला गर्भधारणेची शक्यता फार कमी आहे. आणि यदाकदाचित दिवस गेलेच तर तुमच्या किडनिंना त्याचा भार वाहणे फार कठीण जाईल."

निराश आणि विमनस्क अवस्थेत आम्ही हॉस्पिटलचे आवार सोडल.

घरांत शिरल्यावर मला माझ्या निरर्थ-पोकळ जीवनाची घृणा आली. आज जे कटुसत्य मला डॉक्टरनी सांगितलं त्याची थोडीजरी कल्पना आधी असती तर इतकी वर्ष आम्ही कां थांबलो असतो ? स्वतःला दोष लावून घेण्याव्यतिरिक्त माझ्या हाती काय होतं ? अंधारून येत असतं, ते जाणवतही ..पण पण काही करता येत नाही. असहाय्य असतो आपण !

मी धाय मोकलून रडायला लागले.

मी आईला सर्व काही सांगितलं. अगदी राहूलचं आणि माझं खाजगी बोलणं सुध्दां ! त्या माऊलीने सर्वकाही ऐकून घेतलं आणि मलाही खूप समजावलं .मला कळलं की ती सुध्दा बेचैन झाली होती, हतबल झाली होती.

काही आठवडे गेले.मी प्राप्त परिस्थितीशी मिळत घेण्याचा प्रयत्न करीत होते. मनाला समजावीत होते. अचानक मला एक दिवशी शंका आली की माझी मासिकपाळी चुकली आहे. आधी मला वाटलं की मी ज्या औषधांच्या गोळया घेत आहे त्याचाच कदाचित परिणाम असेल.

मी Pregnancy ची Test घेतली.

माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. मी खरोखरीच गर्भार झाली होते. दुसऱ्या दिवशी मी माझ्या नेहमीच्या Obstetrician डॉक्टरकडे गेले आणि त्यानी "मी नक्की गर्भार आहे" याची खात्री दिली.माझ्या मनांत मोगरा फुलला. मी डॉक्टरांना म्हटलं ,

"डॉक्टर , माझं बाळ हातीपायी चांगलं जन्माला येईल नां हो ?"
" मिसेस देसाई ..तुमचं गर्भारपण कठीण आहे. फार काळजी घ्यावी लागणार आहे तुम्हाला. धोकापण आहे. मूल अतिशय लहान असेल आणि तुमची प्रकृतीपण ढासळण्याची शक्यता आहे." डॉक्टर म्हणाले.
"डॉक्टर , मी सगळे धोके पत्करायला तयार आहे. पण मला आई व्हायचंय्..डॉक्टर मला आई व्हायचंय् हो ..अगदी एकदा तरी !"

तीन महिनेपुरे झाल्यावर मी डॉक्टरना सोनोग्राफी करायला सांगितली आणि प्रथमच मी माझं बाळ मॉनिटरवर पाहिलं आणि मी घेतलेला निर्णय बरोबर होता याची खात्री मला पटली.

डॉक्टरांनी भाकीत केल्याप्रमाणे माझं गर्भारपण कठीण होतं.मला सारख्या उलटया व्हायच्या. खाण्यावरची साफ वासना नष्ट झाली. कडक डोहाळे लागले आणि चेकअपसाठी हॉस्पिटलच्या फेऱ्या वाढल्या.

राहूलला कामावर जावं लागत असे. माझी नोकरी तर मी केव्हाच सोडून दिली होती. रात्रंदिवस माझी आई माझ्याजवळ होती. तीच मला धीर देत राही. मी फार थकले किंवा संत्रस्त झाले तर ती मला जवळ घ्यायची आणि कुरवाळून म्हणायची, "काही घाबरू नकोस ! मी आहे ना तुझ्याजवळ ! तू चांगली सुखरूप बाळंतिण होशील आणि तुझं बाळ पण छान असेल !"
प्रेमाच्या ओथंबलेल्या दृष्टीने मला तिनं ओलेचिंब करून टाकलं आणि मग तिनं मला आमच्या कुलदेवीचा अंगारा लावाला.

आठवा महिना लागला आणि माझ्या पोटांत दुखायला लागलं. नशीबाने त्या दिवशी राहूल घरांत होता. जशया कळा वाढू लागल्या तशी राहूलने गाडी काढून मला व आईला हॉस्पिटलला आणलं. आई शेवटपर्यंत माझ्या बरोबर होती. डॉक्टरांना सिझेरियन सेक्शन करून मूल काढावं लागलं. जन्माला आली तेव्हा माझी मुलगी फक्त दोन पौंड बारा औंस होती. टुकटुकीत आणि गोरीपान ! अगदी बापासारखी... इथल्या पद्धतीप्रमाणे आम्हाला तिचं नांव ठेवावं लागलं .. शुभांगी ! शुभांगी झाली आणि काही क्षणच तिला माझ्या छातीशी ठेवली नर्सनं ! लगेच तिला ICU विभागांत नेलं.

जसजशी शुभांगी वाढू लागली तसतशी माझी तब्येत खालावत चालली. मला तिला पाजायचं होतं, हाताचा पाळणा करून अंगाईगीत गायचं होतं, तिला घरी न्यायच होतं. पण मी स्वतःच माझ्या बिछान्यावरून उठून बसूं शकत नव्हते.

" तुझ्या या बाळंतपणामुळे तुझ्या किडनीवर फार ताण आलेला आहे. शक्यतो लवकर तुला किडनी Transplant करावी लागणार आहे." माझे डॉक्टर मला म्हणाले.

संध्याकाळी राहूल आईला घेऊन आला. त्याला मी डॉक्टर काय म्हणतात ते सांगितले. राहूल लगेच आपली एक किडनी द्यायला तयार झाला. आईने ते ऐकलं. ती म्हणाली,
" राहूल ते काही नाही. तू किडनी द्यायला नकोस. मी माझी किडनी द्यायला एका पायावर तयार आहे."
" काही नको .. आई,.. तू आता पर्यंत खूप काही केलं आहेस आमच्यासाठी. शिवाय तुझं वयही झालं आहे. साठीला आली आहेस तू आई !"
" हे बघ अंजली..माझं वय झालं असलं तरी माझी किडनी तुला योग्य आहे किंवा नाही याचा निर्णय डॉक्टरांना घेऊ दे."

पुढचे काही दिवस मला डायलेसिस मशीनवर ठेवलं आणि माझ्या अनेक टेस्टस् केल्या जात होत्या.

सहा महिने झाले. मी व शुभांगी घरी आलो होतो. डायलेसीससाठी आठवडयांतून तीन वेळा नर्स घरी यायची. आई मला सकाळचा तुपातला सांजा करून द्यायची. शुभांगीच्या अंगाला तेल लावून तिला पायावर झुलटी घालून आंघोळ घालायची. मी निमूटपणे पलंगावर बसून तो निरागस कौटुंबिक आनंद पहात असायची.

एक दिवशी अशाच दुपारचा फोन वाजला. मी घाईघाईने घेतला. नेहमीच्या परिचयाच्या डॉक्टरांचा आवाज आला.
" Hallo ..Anju..Dr. Hopkins here. Good news ..the results of the tests are here. Your Mom is a perfect match ! Congratulations !"

आईला मी जेव्हा डॉक्टर काय म्हणाले ते सांगितलं तेव्हा तिला इतका आनंद झाला की विचारू नका. पण मला मात्र आनंद झाला नाही. मी तिला म्हटलं,

" आई. तुला ते मी मुळीच करून देणार नाही. तू मला जन्म दिलास.. लहानाची मोठी केलंस...माझं सूख ते आपलं मानलंस..आणखी किती त्याग करायला मी तुला सांगू ? नाही ..आई..यापुढे नाही !"

मला वाटलं आई चिडेल ..रागवेल..संताप करून घेईल. पण तिनं यांतलं काही एक केलं नाही. ती माझ्याजवळ आली. माझा हात हातांत घेतला आणि अगदी शांतपणे म्हणाली ,
" बाळ .. समज तुझ्या जागी तुझी मुलगी शुभांगी असती आणि तिला तुझी किडनी लागली असती तर नसती कां दिली तू ?
" अर्थातच ..पण आई..!"

पाळण्यांत शांतपणे झोपलेल्या शुभांगीकडे माझं लक्ष गेलं. ती झोपेत खुदुखुदू हसत होती. माझे शब्द माझ्या जिभेवरच राहिले.

आईचं म्हणणं बरोबर होतं. मी माझ्या शुभांगीवरून वेळ आलीतर किडनीच काय पण जीवही ओवाळून टाकला असता. माझ्या दुधावरची साय ती !

मी आईकडं पाहिलं. तिला अर्थ समजला.

पुढच्याच आठवडयांत आम्ही दोघी हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. मला गुंगीचे औषध दिलं होतं. तीन दिवसानंतर हळूहळू मला शुद्ध येत होती. माझ्या कॉटच्या मागे कुणी तरी उभे आहे असल्याचा मला भास झाला. डोळे थोडे ताणून पाहिलं. माझी आईच मागे उभी होती. मी तिला क्षीण आवाजांत म्हटलं ,
"आई. तू उभी कशी? इतक्यांत कशी बरी झालीस तू ?"

आई हंसली आणि गुणगुणू लागली.

" चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई
गोठयांत वासरांना हया चाटतात गाई
वात्सल्य हे पशूंचे मी रोज रोज पाहीं
पाहून अंतरात्मा व्याकूळ हाय होई...."

दिवाकर कारखानिस
104 Grand Falls Ct,
Dickinson, TX 77539